# प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली

## हवामानावर आधारीत कृषि सल्ला (ठाणे व पालघर जिल्हा)

(०२३५८) २८२३८७

अंक ०७/२०१९ | दिनांक २२/०१/२०१९ | कालावधी ५ दिवस


डॉ. सुभाष चव्हाण,
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२२४३१०६७

डॉ. विजय मोरे,
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

डॉ. शितल यादव,
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक १६/०१/२०१९ ते २२/०१/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक २३/०१/२०१९ सकाळी ८:३० पासून २७/०१/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १६/०१ | १७/०१ | १८/०१ | १९/०१ | २०/०१ | २१/०१ | २२/०१ | | २३/०१ | २४/०१ | २५/०१ | २६/०१ | २७/०१ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | - | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| ३१.० | ३२.० | ३१.८ | ३२.० | ३२.८ | ३२.० | - | कमाल तापमान (अं.से) | २९ | २८ | ३० | २९ | २९ |
| १५.४ | १६.६ | १५.० | १३.६ | १५.० | १५.६ | - | किमान तापमान (अं.से) | १७ | १५ | १५ | १५ | १४ |
| १ | ० | ० | ० | ० | ० | - | मेघाच्छादन (ऑक्टा) | १ | १ | ० | ० | ० |
| ८५ | ७८ | ६१ | ८९ | ८९ | ८८ | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ८१ | ८३ | ८० | ८१ | ८१ |
| ४० | ४४ | ३४ | ३९ | ४३ | ५७ | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ६७ | ६९ | ६९ | ६७ | ६७ |
| २.६ | १.९ | ३.१ | १.९ | १.९ | १.४ | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ६ | ८ | १० | १० | १२ |
| शांत | शांत | आ.द. | शांत | शांत | शांत | - | वाऱ्याची दिशा | ई. | ई.पू. | पू. | ई.पू. | ई.पू. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०१८ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | ०.० | २३५९.६ |

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

**दिनांक २३ ते २७ जानेवारी २०१९ पर्यंत कमाल व किमान तापमान साधारण राहील. दिनांक २३ ते २७ जानेवारी २०१९ पर्यंत वाऱ्याचा वेग ६ ते १२ कि. मी. प्रति तास राहील.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| वाल | फुलोरा व शेंगा अवस्था | • वाल पिकामध्ये शेंगा पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता आहे. प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी किडग्रस्त शेंगा काढून नष्ट कराव्यात व प्रवाही डायमेथोएट ३० टक्के २० मि. ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>• पिकास दाणे भरण्याच्या अवस्थेत आवश्यकतेनुसार पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| भुईमूग | वाढीची अवस्था | • विनाआच्छादानावर लागवड केलेल्या भुईमूग पिकामध्ये पेरणीनंतर ३० ते ३५ दिवसांनी गरजेनुसार एक खुरपणी करून नंतर पिकाला स्वस्तिक अवजाराच्या सहाय्याने मातीची भर द्यावी. |
| आंबा | मोहोर अवस्था | • पुढील पाचही दिवस वाऱ्याचा वेग जास्त असल्याने नवीन लागवड केलेल्या कलमांना काठीचा आधार द्यावा.<br>• आंबा पिकामध्ये मोहोर संरक्षण वेळापत्रकानुसार तिसरी फवारणीसाठी (मोहोर फुलण्यापुर्वी) इमिडाक्लोप्रीड १७.८ टक्के प्रवाही ६ मि. ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. त्यामुळे तुडतुडे तसेच मिजमाशीचे नियंत्रण होवू शकेल व त्याचा परपरागीकरण करणाऱ्या कीटकावर होणारा परिणाम टाळता येईल. तसेच फवारणीच्या वेळेस किटकनाशकाच्या द्रावणामध्ये भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी ५ टक्के हेक्झाकोनॅझोल ५ मि. ली. किंवा पाण्यात विरघळणारे ८० टक्के गंधक २० ग्रॅम प्रति १० लिटर या प्रमाणात वापरावे. |
| चिकू | फुलोरा अवस्था | • चिकू पिकामध्ये पाने व कळ्या खाणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी फांद्यांवर अळीने तयार केलेली पानांची जाळी आतील अळीसह काढून नष्ट करावीत व ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी. |
| केळी | - | • केळी बागेत ७ ते ८ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी.<br>• पुढील पाचही दिवस वाऱ्याचा वेग जास्त असल्याने फुलोऱ्यावरील केळीच्या झाडाला काठीचा आधार द्यावा. |
| भाजीपाला/ फळबाग रोपवाटिका | फळधारणा | • पुढील पाचही दिवस वाऱ्याचा वेग जास्त असल्याने भेंडी, वांगी, टोमेटो, मिरची इ. पिकांना भर दयावी आणि काठीचा आधार द्यावा.<br>• टोमॅटो व वांगी पिकास (लागवडीनंतर २ महिन्याचे झाले असल्यास) नत्राचा दुसरा हप्ता हेक्टरी ५० किलो नत्र (१०८ किलो युरिया) या प्रमाणात दयावा.<br>• कलिंगड पिकामध्ये मावा किडीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता आहे. प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी, डायमेथोएट १० मि. ली. किंवा मॅलॅथिऑन २० मि. ली. प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. तसेच शेतामध्ये पिवळ्या चिकट कागदाच्या सापळ्याचा वापर करावा.<br>• फळबाग रोपवाटिकेस नियमित पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| दुभती जनावरे/ शेळ्या/ कुकुटपालन | - | • रात्रीच्यावेळी किमान तापमानात घट होत असल्याने जनावरांच्या गोठयात तसेच कोंबड्यांच्या शेड मध्ये गरजेनुसार विजेचे बल्ब आणि शेडभोवती पडदे गुंडाळावे.<br>• जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ पाणी पुरवठ्याची व्यवस्था करावी.<br>• दुभत्या जनावरांना १ ते १.५ किलो खुराक, १५ ते २० किलो हिरवी वैरण व ४ ते ५ किलो वाळलेली वैरण द्यावी.<br>• शेळ्यांमध्ये जंताचे औषध देण्याचे राहिले असल्यास लवकरात लवकर देण्यात यावे. त्यासाठी शेळ्यांना अलबेंडाझॉल ७.५ मि. ग्रॅम प्रति किलो वजनास या प्रमाणात औषध द्यावे. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**